आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

३ ऑगस्ट २०२४ - शनिवार

**ठळक बातम्या**

- जागतिक अन्न सुरक्षा आणि पोषण सुरक्षेबाबत तोडगा काढण्यात भारत महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- राज्यातल्या नाशिक फाटा-खेड कॉरिडॉरसह देशभरातल्या आठ राष्ट्रीय द्रुतगती मार्ग कॉरिडॉर निर्मिती प्रकल्पांना केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजूरी

- पश्चिम घाट क्षेत्राअंतर्गत येत असलेल्या महाराष्ट्रासह सहा राज्यांमधल्या ५६ हजार ८०० चौरस किलोमीटर पेक्षा जास्त परिसराला ‘पर्यावरणीय दृष्ट्या संवेदनशील क्षेत्र म्हणून घोषित करण्यासाठी केंद्र सरकारकडून नवीन मसुदा अधिसूचना जारी.

- सर्वोच्च न्यायालयाच्या लोक अदालतीमध्ये एक हजारापेक्षा जास्त खटले निकाली

**आणि**

- भारत आणि श्रीलंका यांच्यातला पहिला एकदिवसीय क्रिकेट सामना बरोबरीत

**<><><><><>**

जागतिक अन्न सुरक्षा आणि पोषण सुरक्षेबाबत तोडगा काढण्यात भारत महत्त्वाची भूमिका बजावत आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. नवी दिल्ली इथं ३२व्या आंतरराष्ट्रीय कृषी अर्थतज्ञ परिषदेचं उद्घाटन

प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झालं, त्या वेळी ते बोलत होते. सरकार कृषी क्षेत्रात विविध सुधारणा करत असून यामागे शेतकऱ्यांचं जीवनमान सुधारण्याचा हेतू आहे, सरकारच्या आर्थिक धोरणांच्या केंद्रस्थानी कृषिक्षेत्र आहे, असं ते म्हणाले. तृणधान्यं, दूध, डाळी आणि मसाल्यांचं सर्वात जास्त उत्पादन भारतात होत असल्याचंही त्यांनी नमूद केलं. देशात रसायनमुक्त, नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देण्यात येत आहे. यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पात शाश्वत शेतीवर मोठा भर देण्यात आल्याचंही प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. देशात कृषिक्षेत्रातलं संशोधन आणि शिक्षणासाठी चांगलं वातावरण असल्याची ग्वाही त्यांनी दिली. यंदा या परिषदेत सुमारे ७५ देशांच्या एक हजारापेक्षा जास्त प्रतिनिधींनी भाग घेतला आहे. यावर्षीची परिषदेची मध्यवर्ती संकल्पना ‘शाश्वत कृषी-अन्न प्रणालीच्या दिशेने परिवर्तन’ अशी आहे.

**<><><><><>**

देशातल्या सुमारे ५० हजार कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या आठ राष्ट्रीय द्रुतगती मार्ग कॉरिडॉर निर्मिती प्रकल्पांना केंद्रीय मंत्रिमंडळानं मान्यता दिल्यानं देशाच्या आर्थिक वृद्धीला चालना मिळेल आणि रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होतील, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. यातून उज्ज्वल आणि संपर्कव्यवस्थांनी जोडलेल्या भारताच्या निर्मितीची केंद्र सरकारची वचनबद्धता दिसून येते, असं त्यांनी समाज माध्यमावरच्या पोस्ट मध्ये म्हटलं आहे.

प्रधानमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील आर्थिक व्यवहार विषयक मंत्रिमंडळ समितीनं देशभरात ५० हजार ६५५ कोटी रुपये खर्चून बांधण्यात येणाऱ्या ९३६ किलोमीटर लांबीच्या ८ महत्त्वाच्या राष्ट्रीय जलदगती कॉरिडॉर प्रकल्पांच्या विकासाला काल मंजुरी दिली. यामुळे देशातली दळणवळण कार्यक्षमता सुधारेल, वाहतूक कोंडी कमी होईल आणि देशभरातील रस्तेजोडणी वाढेल. यामध्ये

महाराष्ट्रातल्या ३० किलोमीटर लांबीच्या आठ पदरी नाशिक फाटा-खेड कॉरिडॉरचा समावेश आहे. हा कॉरिडॉर पुणे, पिंपरी-चिंचवड आणि चाकण यांसारख्या प्रमुख आर्थिक केंद्रांना जोडेल, यामुळे इथल्या आर्थिक विकासालाही गती मिळेल.

<><><><><>

केरळ राज्यातल्या अलाप्पुझा जिल्ह्यातल्या मारारीकुलम इथून काल राज्य पोलिसांच्या दहशतवादी पथकानं माओवादी नेता सी. पी. मोईदीन याला अटक केली. राज्यमार्ग परिवहन महामंडळाच्या बसनं तो कोल्लम ते त्रिशूर असा प्रवास करत असताना पोलिसांनी त्याला ताब्यात घेतलं. मोईदीन हा तब्बल ३६ गुन्ह्यांमध्ये आरोपी असून तो २०१४ पासून फरार होता.

<><><><><>

केरळ राज्यातल्या वायनाड जिल्ह्यातल्या भूस्खलनग्रस्त भागात लष्कराकडून मानवतावादी दृष्टीनं मदत आणि बचाव कार्य युद्धपातळीवर सुरु आहे. लष्कर, राष्ट्रीय आपत्ती निवारण दल आणि इतर संस्थांचे कर्मचारी दुर्घटना स्थळी मृतदेह शोधण्यासाठी सहकार्य करत आहेत. राज्य सरकारच्या विनंतीनुसार, ढिगाऱ्याखाली अडकलेल्यांचा तपास करण्यासाठी एक झेव्हर रडार, चार रेको रडार आणि विशेष तज्ञ दिल्लीहून मागवण्यात येत असल्याचं लष्कराच्या अधिकाऱ्यांनी सांगितलं. आज दिवसभर ढिगाऱ्याखाली दबलेले मृतदेह काढण्यावर तसंच अत्यावश्यक सेवा पूर्ववत करण्यावर भर दिला जाईल, असं लष्करानं स्पष्ट केलं.

<><><><><>

बिहारमध्ये काल दिवसभरात २४ तासात वीज अंगावर पडून किमान आठ जणांचा मृत्यू झाला. पटना आणि औरंगाबाद इथं प्रत्येकी ३ आणि नावदा आणि सरन इथं प्रत्येकी एका व्यक्तीचा मृत्यू झाला. बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी या घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं असून मृतांच्या कुटुंबांना चार लाख रूपयांच्या अर्थसहाय्याची घोषणा केली आहे. नागरिकांनी पाऊस पडत असताना शेतीच्या कामासाठी घराबाहेर पडणं टाळावं, असा सल्ला हवामान विभागानं दिला आहे.

**<><><><><>**

पश्चिम घाट क्षेत्राअंतर्गत येत असलेल्या महाराष्ट्रासह सहा राज्यांमधल्या ५६ हजार ८०० चौरस किलोमीटर पेक्षा जास्त परिसराला 'पर्यावरणीय दृष्ट्या संवेदनशील क्षेत्र' म्हणून घोषित करण्यासाठी केंद्र सरकारकडून नवीन मसुदा अधिसूचना जारी केली आहे. महाराष्ट्रासह गुजरात, गोवा, कर्नाटक, केरळ, तामिळनाडू या सहा राज्यांचा यात समावेश आहे. या संदर्भात सरकारनं जनतेकडून येत्या साठ दिवसांमध्ये सूचना आणि हरकती मागवल्या असून नागरिक esz-mef@nic.in या संकेत स्थळावर त्याची नोंद करू शकतात. सहा राज्यातला हा परिसर पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र घोषित झाल्यानंतर या भागात उत्खनन, खाणकाम आणि मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधांचा विकास, आदी कामांवर बंधनं येतील, असं सरकारनं स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

सर्वोच्च न्यायालयानं आयोजित केलेल्या लोक अदालतीमध्ये एक हजारहून अधिक खटले निकाली निघाले आहेत. याअंतर्गत दिवाणी, भूसंपादन आणि विवाहविषयक अनेक खटले मार्गी लागले अशी माहिती केंद्रीय कायदा आणि न्यायमंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी दिली. सर्वोच्च न्यायालयाचं ७५ वं स्थापना

वर्ष साजरं करण्यासाठी न्यायालयानं हाती घेतलेल्या विशेष लोक अदालत उपक्रमाचा आज अंतिम दिन असून या निमित्त आयोजित कार्यक्रमात मेघवाल बोलत होते. या लोक अदालतीमुळे सर्वांना सुलभ, जलद आणि कमी खर्चिक न्याय मिळतो.

<><><><>

भारताचे यूनेस्कोतले राजदूत विशाल शर्मा यांनी काल बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालयाच्या ऐतिहासिक वास्तूला भेट दिली. जागतिक वारसास्थळ असलेल्या या इमारतीची वास्तुकला, स्थापत्य रचना आणि कोरीव काम अद्वितीय आहे, मुंबई महानगरपालिकेनं या इमारतीचं उत्तम प्रकारे जतन केलं असून हे कार्य प्रशंसनीय आहे, असं ते यावेळी म्हणाले.

<><><><>

भारत आणि श्रीलंका यांच्यात काल एकदिवसीय क्रिकेट मालिकेतला झालेला पहिला सामना बरोबरीत सुटला. या सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना श्रीलंकेनं जोरावर निर्धारीत ५० षटकांमध्ये ८ बाद २३० धावा केल्या. विजयासाठी २३१ धावांचा पाठलाग करताना भारतानं ७५ धावांची दमदार सलामी दिली. मात्र त्यानंतर भारताचा संपूर्ण संघ ४८व्या षटकात २३० धावांमध्येच माघारी परतला. कर्णधार रोहीत शर्मानं धडाकेबाज अर्धशतकी खेळी केली. तर श्रीलंकेच्या वानिनदू आणि चरिथ यांनी प्रत्येकी ३ गडी बाद केले.

<><><><>

पॅरिस ऑलिम्पिकमधे आज नेमबाज मनू भाकरचं तिसरं पदक थोडक्यात हुकलं. महिलांच्या २५ मीटर पिस्टल प्रकारात ती चौथ्या स्थानावर राहिली. या

स्पर्धेत तिनं दोन पदकांची कमाई केली आहे. दरम्यान, ऑलिम्पिकच्या आठव्या दिवशी तिरंदाजी, मुष्टियुद्ध, नौकानयन, गोल्फ या स्पर्धांमध्ये आज भारतीय महिला खेळाडू सहभागी होतील. तिरंदाजीत वैयक्तिक प्रकारात दीपिका कुमारी आणि भजन कौर लक्ष्याचा वेध घेण्याचा प्रयत्न करतील. नेत्रा कुमनन नौकानयन स्पर्धेत सहभागी होईल. तर पुरुषांच्या गटात नौकानयनपटू विष्णू सर्वनन, गोल्फमध्ये शुभंकर शर्मा आणि गगनजीत कौर, तर मुष्टियुद्ध स्पर्धेत निशांत देव पदकांच्या शर्यतीत टिकून राहण्यासाठी प्रयत्नशील राहतील.

स्पर्धेत काल बॅडमिंटन पुरुष एकेरीत लक्ष्य सेननं उपांत्य फेरी गाठली. पुरुष हॉकी संघानं ५२ वर्षांनी ऑस्ट्रेलियाच्या संघावर ३-२ अशी मात केली. त्यांचा उपांत्यपूर्व फेरीचा सामना उद्या ग्रेट ब्रिटनशी होणार आहे.

**<><><><><>**

अमेरिकेच्या उपाध्यक्ष कमला हॅरिस यांनी अध्यक्षपदाच्या आगामी निवडणुकीसाठी डेमॉक्रॅटिक पक्षाकडून अधिकृतरीत्या उमेदवारी मिळवली आहे. यासाठी पक्षाच्या प्रतिनिधींची जितकी मतं आवश्यक आहेत, तितकी मतं हॅरिस यांना मिळाल्याची घोषणा पक्षाच्या राष्ट्रीय समितीचे अध्यक्ष जेमी हॅरिसन यांनी काल केली. एकंदर ४ हजार मतांपैकी २ हजार ३५० मतं हॅरिस यांना मिळाली. नोव्हेंबर महिन्यात होणाऱ्या या निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाचे डोनाल्ड ट्रम्प आणि कमला हॅरिस यांच्यात लढत होणार आहे.

**//<><><><><>//**